# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला
दिनांक:— २९/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | आरोपी श्री. चंद्रकांत माणिकराव अवथनकर, वय ४४ वर्ष, पद— चेकर (तपासनिस) अतिरीक्त कार्यभार प्रभारी लिपीक, जन्ममृत्यु विभाग, महानगरपालीका, अकोला ता.जि. अकोला वर्ग—४ रा. गितानगर, गजानन महाराज मंदीर जवळ, अकोला ता.जि. अकोला |
| ३ | घटना तारीख वेळ | दिनांक २९.०८.२०२५ चे ११.५४ ते १२.१० वा. |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | रू. ३००/— |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | रू. ३००/— |
| ६ | घटनास्थळ | महानगरपालीका, अकोला ता.जि. अकोला |

थोडक्यात हकिगत :— यातील तक्रारदार यांनी त्यांच्या तिन मुलांच्या जन्म प्रमाणपत्रवर असलेले नांव, आधार कार्ड आणि पत्ता दुरूस्ती करण्याकरीता महानगर पालीका, अकोला येथे आवश्यक सर्व कागदपत्रांसह अर्ज दाखल केला होता. त्याअनुषंगाने तक्रारदार हे महानगर पालीका, अकोला येथे जावून संबंधीत कर्मचारी श्री. अवथनकर, प्रभारी लिपीक यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांच्या तिन मुलांच्या जन्म प्रमाणपत्रवर असलेले नांव, आधार कार्ड आणि पत्ता दुरूस्ती करून जन्म प्रमाणपत्र देण्याकरीता तक्रारदाराकडे रू. ३००/— लाच रकमेची मागणी केली. परंतु तक्रारदारास श्री. अवथनकर, प्रभारी लिपीक यांनी मागणी केलेली लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी श्री. अवथनकर, प्रभारी लिपीक यांचेविरूध्द कार्यवाही करण्याकरीता ला.प्र.वि. अकोला घटकाकडे दिनांक २८.०८.२०२५ रोजी तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीवरुन दिनांक २८.०८.२०२५ रोजी महानगरपालीका, अकोला येथे लाच मागणी पडताळणी करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री. अवथनकर, प्रभारी लिपीक यांनी तक्रारदाराकडे पंचासमक्ष रू. ३००/— लाच रकमेची मागणी केली.

त्यानंतर आज दिनांक २९.०८.२०२५ रोजी महानगरपालीका, अकोला येथे रचण्यात आलेल्या यशस्वी सापळा कार्यवाही दरम्यान श्री. अवथनकर, प्रभारी लिपीक यांनी तक्रारदाराकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. ३००/— पंचासमक्ष स्विकारली. त्यावरून नमुद आरोपीस लाच रक्कमेसह ताब्यात घेण्यात आलेले असुन पोलीस स्टेशन सिटी कोतवाली जि. अकोला येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९८५०४८८७८८), मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९७६४२१०४८५), श्री. मिलिंदकुमार बहाकर, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि. अकोला (९१५८८२२६७६) यांचे मार्गदर्शनात सापळा अधिकारी श्री. प्रविण वेरूळकर, पोलीस निरीक्षक (९७६५१४१९२५), श्री. अतुल इंगोले, पोलीस निरीक्षक (८८८८७५७५५०), पोलीस अंमलदार दिगांबर जाधव, अविनाश पाचपोर, गोपाल किरडे, संदिप ताले, असलम शहा, निलेश शेगोकार, चालक नफिस सर्व ला.प्र.वि. अकोला यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

ऑफिस फोन नं. ०७२४—२४१५३७०, टोल फ्रि क्रमांक— १०६४
मोबाईल क्र. ९४०३८०१०६४

(मिलिंदकुमार अ. बहाकर)
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला